# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका भवन, २ रा मजला,
वैद्यकीय विभाग, मुंबई-पुणे हायवेलगत, पिंपरी- ४११ ०१८

जाहिरात क्र. ६९९/२०२१ दि. २१/०१/२०२१

## Walk- in -Interview (थेट मुलाखत)

### राष्ट्रीय कीटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत डेंग्यु, चिकुनगुन्या- डास नियंत्रण, पर्यावरण व्यवस्थापनाकरीता ब्रिडींग चेकर्स पदे भरणेबाबत

पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रीय कीटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत डेंग्यु, चिकुनगुन्या- डास नियंत्रण, पर्यावरण व्यवस्थापनाकरीता ब्रिडींग चेकर्स या पदाची पदे खालीलप्रमाणे भरावयाची आहेत. सदर पदाची शैक्षणिक अर्हता, पदसंख्या, तपशिल व अटी-शर्ती खालीलप्रमाणे -

| अ.क्र. | पदाचे नाव | रुग्णालय झोन | रिक्त पदसंख्या | मुलाखतीचे स्थळ, दिनांक व वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | ब्रिडींग चेकर्स | आकुर्डी रुग्णालय | ०३ | यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय, चाणक्य हॉल, १ ला मजला, पिंपरी-१८ दिनांक : २४/०१/२०२१, सकाळी- १० ते ११ वाजेपर्यंत |
| २ | | यमुनानगर रुग्णालय | ०३ | |
| ३ | | भोसरी रुग्णालय | ०५ | |
| ४ | | वाय.सी.एम.रुग्णालय | ०२ | |
| ५ | | सांगवी रुग्णालय | ०३ | |
| ६ | | तालेरा रुग्णालय | ०४ | |
| ७ | | जिजामाता रुग्णालय | ०३ | |
| ८ | | थेरगाव रुग्णालय | ०२ | |
| | | **एकुण** | **२५** | |

**ब्रिडींग चेकर्स या पदाची शैक्षणिक अर्हता व वय खालीलप्रमाणे आहे.**

| | |
|---|---|
| शैक्षणिक अर्हता | या पदासाठी उमेदवारांची शैक्षणिक अर्हता किमान १० वी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. |
| वय | किमान १८ वर्षे ते कमाल ४३ वर्षे |

**अटी व शर्ती-**

१) राष्ट्रीय कीटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत भरण्यात येणाऱ्या वरील पदाची निवड थेट मुलाखतीने करण्यात येईल.
२) सदरची पदे राष्ट्रीय कीटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत राहतील, सदर पदांचा पिंपरी चिंचवड म.न.पा. आस्थापनेशी कसल्याही प्रकारचा संबंध राहणार नाही.
३) सदरची पदे पूर्णपणे केवळ राष्ट्रीय कीटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम कामकाजासाठी तात्पुरत्या स्वरुपात भरावयाची असल्याने अर्जदारास कायमपदी नियुक्तीचा हक्क सांगता येणार नाही. ज्या दिवशी सदर पदांची आवश्यकता नसेल त्यावेळी कोणत्याही नोटीशीशिवाय त्यांची सेवा समाप्त केली जाईल.
४) सदरच्या पदांवरील नेमणुका या अत्यंत हंगामी स्वरुपाच्या असून उमेदवाराला कायमस्वरुपी हक्क सांगता येणार नाही, असे हमीपत्र १०० रुपयांच्या स्टॅम्पवरती नोटरीद्वारे प्रमाणित करून नियुक्तीवेळी सादर करणे बंधनकारक राहील.
५) सदरच्या पदावरील कर्मचारी यांनी महिन्यातून किमान २५ दिवस काम करणे आवश्यक आहे.
६) सदरच्या पदावरील कर्मचाऱ्यांच्या नेमणुका या २९ दिवसांकरिता आहेत. त्यामुळे प्रत्येक २९ दिवसानंतर या कर्मचाऱ्यांच्या सेवेमध्ये ०१ दिवसाचा खंड करून त्यांना परत २९ दिवसांचे आदेश देण्यात येऊन त्यांचा एकुण सेवाकालावधी फक्त ०३ महिन्यांचा असेल.
७) सदर पदावरील कर्मचाऱ्यांना दररोज र.रु.४५०/- प्रमाणे काम केलेल्या दिवसांचे (Daily Wages) वेतन अदा करण्यात येईल.
८) सदर पदावरील कर्मचाऱ्यांना वेतन देताना त्यांनी एका महिन्यामध्ये साधारण २५ दिवस काम केले असल्यास २५ x ४५० रु. असे रु. ११२५०/- असे एका महिन्याचे वेतन काढण्यात येईल.
९) सदर पदावरील कर्मचाऱ्यांच्या हजेरीचा तसेच कामकाजाचा आढावा पर्यवेक्षकामार्फत घेऊन मगच त्यांचे वेतन अदा करण्यात येईल.
१०) सदर जाहिरातीमधील पदसंख्येमध्ये बदल होऊ शकतो.
११) सदर पदांची मुलाखत २० गुणांची असून यामध्ये उमेदवारांची निवड करताना उमेदवार १० वी पास असल्यास ०२ गुण, १२ वी पास असल्यास ०४ गुण, अतिरिक्त शिक्षण असल्यास ०४ गुण, निवड समितीस जास्तीत जास्त १० गुण देता येतील व मुलाखत १० गुणांची राहील.
१२) सदर पदांसाठी फक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील रहिवासी असलेल्या उमेदवारांच्या अर्जाचा विचार केला जाईल. इतर अर्जाचा विचार केला जाणार नाही. त्यामुळे उमेदवारांनी रहिवासी पुरावा (आधारकार्ड, मतदान ओळखपत्र, रेशनिंगकार्ड छायांकित सत्यप्रत) अर्जासोबत सादर करणे बंधनकारक राहील.
१३) सदरची भरती रद्द करणे अथवा स्थगित करणे तसेच निवड/नियुक्ती प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर कोणतेही कारण न देता बदल अथवा रद्द करण्याचे अधिकार मा. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी राखून ठेवलेले आहेत.
१४) प्रस्तुतचे जाहिरातीमधील पदांकरिता करावयाच्या अर्जाचा नमुना जाहिरातीसोबत महापालिका संकेतस्थळ www.pcmcindia.gov.in वर उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. सदरचा अर्ज उपलब्ध करुन घेऊन उमेदवाराने सादर करणे अपेक्षीत आहे. याकरिता महापालिकेमार्फत स्वतंत्रपणे अर्ज उपलब्ध करुन दिला जाणार नाही याची नोंद घ्यावी.
१५) सदर जाहिरातीच्या अनुषंगाने गुणानुक्रम यादी तसेच अंतिम निवड यादी, नेमणूक आदेश महापालिकेच्या संकेतस्थळ www.pcmcindia.gov.in वर प्रसिद्ध केले जातील. ते संबंधीत उमेदवारांनी उपलब्ध करून घेऊन मुदतीत वैद्यकीय विभाग, मुख्य कार्यालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८ येथे रुजू व्हावयाचे आहे. याकरीता कोणत्याही उमेदवारास स्वतंत्रपणे पत्रव्यवहार, दूरध्वनी, मोबाईल अथवा एस.एम.एस.द्वारे संपर्क करण्यात येणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.
१६) मुलाखतीच्या वेळापत्रकामधील दिनांकास १ तासामध्ये म्हणजे सकाळी १० ते ११ वाजेपर्यंत या वेळेत जेवढे उमेदवार उपस्थित असतील अशा उमेदवारांची हजेरी नोंदवून व त्यांचेकडून विहित नमुन्यातील अर्ज व कागदपत्रे घेण्यात येतील. त्यानंतर उपस्थित असलेल्या उमेदवारांची मुलाखतीसाठी नोंदणी करणेत येणार नाही व याबाबतचा अंतिम निर्णय सदस्य सचिव तथा वैद्यकीय संचालक पि.चिं.म.न.पा. यांचा राहील.
१७) परिपूर्ण भरलेला अर्ज व पुढील आवश्यक कागदपत्रे जोडण्यात आलेले अर्ज पात्र होतील. अपूर्ण अर्जांचा विचार केला जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**कागदपत्रे**- १. इच्छुक व पात्र उमेदवारांनी महापालिका संकेतस्थळ www.pcmcindia.gov.in वर दिलेल्या नमुन्यातील अर्ज व त्यासोबत शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्रे व खालील कागदपत्रांच्या छायांकित सत्यप्रती जोडाव्यात. (अर्जासोबत मूळ कागदपत्रे जोडून नयेत.) २. इयत्ता १० उत्तीर्ण प्रमाणपत्र ३. पासपोर्ट साईज फोटो ४. जन्म तारखेचा पुरावा (जन्माचा दाखला/शाळा सोडल्याचा दाखला) ५. रहिवासी दाखला किंवा आधारकार्ड, मतदान ओळखपत्र, रेशनिंगकार्ड, ६. अनुभव प्रमाणपत्र.

सही/-
**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

# उमेदवाराने करावयाचा अर्जाचा नमुना

प्रति,
मा. आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे ४११ ०१८

फोटो

**विषय : ब्रिडींग चेकर्स या पदासाठी अर्ज**
**संदर्भ - वैद्यकीय विभागाकडील दि. - -२०२० रोजीची जाहिरात**

महोदय,

उपरोक्त संदर्भिय जाहिरातीनुसार मी मनपाचे रुग्णालयामध्ये हंगामी पद्धतीने ब्रिडींग चेकर्स या पदासाठी आवश्यक ती अर्हता धारण करीत असून या पदासाठी निवड होण्याकरीता विहीत नमुन्यातील अर्ज सादर करीत आहे :

| अ. क्र. | तपशील | माहिती | | |
|---|---|---|---|---|
| १ | संपूर्ण नाव | आडनाव | नाव | वडील / पतीचे नाव |
| २ | पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता | | | |
| ३ | ई-मेल : | | मोबाईल क्र. : | |
| ४ | जन्म तारीख : | | | |
| ५ | लिंग | पुरुष | स्त्री | |
| ६ | सद्य:स्थितीत महापालिकेत कामकाज करीत आहे काय? | होय / नाही | | |
| | होय असल्यास | दवाखान्याचे नाव : | पदनाम : | |
| ७ | अर्ज करावयाचा रुग्णालय झोन नाव : | | | |
| ८ | जात - | जातीचा प्रवर्ग - | | |

| | SC | ST | VJ (A) | NT (B) | NT (C) | NT (D) | OBC | SBC | SEBC | EWS | OPEN |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | शैक्षणिक अर्हतेचा तपशील | | | | | | | | | |
| | शैक्षणिक अर्हता | उत्तीर्ण वर्ष | मिळालेले गुण | टक्केवारी | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| १० | तांत्रिक व इतर अर्हता तपशील | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | अ.क्र. | संस्थेचे नाव, पत्ता व दूरध्वनी क्रमांक | पदनाम | कालावधी | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |

सदरची पदे ही तात्पुरत्या / हंगामी स्वरुपातील नेमणुकीची असून ०३ महिन्यांकरीताच्या नेमणुकीची आहेत याची मला जाणीव असून याबाबत मी भविष्यात कोठेही व कोणताही दावा दाखल करणार नाही. तसेच सद्य:स्थितीत मी या महापालिकेमध्ये मानधन स्वरुपात कार्यरत नाही. वरीलप्रमाणे नमूद केलेली सर्व माहिती, तपशील खरा व बरोबर असून त्याबाबत आवश्यक कागदपत्रांच्या प्रमाणित सत्यप्रती सोबत जोडत आहे. मी असेही प्रमाणित करतो / करते की, वर दिलेली माहिती खोटी / चुकीची अथवा अपुरी असल्याचे आढळून आल्यास नेमणुकीच्या कोणत्याही टप्प्यावर या माहितीच्याआधारे महापालिका सेवेतून कमी करण्यास, तसेच या भरतीकरीताच्या अपात्रतेस मी स्वत: जबाबदार राहिल. याबाबत माझ्याविरुद्ध कायदेशीर कारवाईदेखील केल्यास माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

**स्थळ -** **अर्जदाराची सही -**

**दि. / /२०** **अर्जदाराचे नाव** ----------------------------------------

सहपत्रे- अर्जासोबत खालील प्रमाणपत्रांच्या प्रमाणित सत्यप्रती जोडणे आवश्यक आहे.

१) शैक्षणिक व इतर अर्हतेची प्रमाणपत्रे २) जन्म तारखेचा पुरावा ३) अनुभवाची प्रमाणपत्रे ४) जात प्रमाणपत्र
५) रहिवास पुरावा ६) इतर कागदपत्रे.